# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

संदर्भ क्रं./शिवाजी वि/पात्रता/63 दि.15/07/2016

प्रति,

1. **प्राचार्य/संचालक,**
   **सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था**
2. **सर्व पदव्युत्तर अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक**

**विषयःपदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा—या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशपात्रतेबाबत**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास कळविण्यात येते की, पात्रता विभागामार्फत पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्याचे पात्रता अर्ज पाठविण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षात सविस्तर सूचना व मार्गदर्शक तत्वांसह परिपत्रक पाठविण्यात येते. त्यानुसार सर्व पदवी, पदव्युत्तर किंवा डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज योग्य त्या शुल्कासह विद्यापीठ कार्यालयात पोहोचण्याच्या अंतिम तारखा व पात्रता शुल्काचा तक्ता **(परिशिष्ट अ)** सोबत जोडला आहे. त्याप्रमाणे पात्रता फॉर्म व फीची पूर्तता विहित मुदतीत त्वरित करण्यात यावी.

**<u>A.पात्रता अर्जासंदर्भात विशेष सूचनाः—</u>**

1. प्राचार्यांनी प्रवेश देताना सबंधित विद्यार्थी ज्या—त्या अभ्यासक्रमास पात्र आहे. याची वैयक्तिक खात्री करूनच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. पात्रता अर्जात असलेले प्राचार्याचे प्रमाणपत्र (Certificate of Principal ) हे विद्यार्थ्यांची पात्रता पाहूनच प्राचार्यांनी सही करणे बंधनकारक आहे. अपात्र विद्यार्थ्यांचे असे प्रमाणपत्र देऊन पात्रता अर्ज पाठविल्यास त्यामुळे होणा—या परिणामांची संपूर्ण जबाबदारी प्राचार्यावर राहिल तसेच कोणत्याही विद्यार्थ्याचे परिक्षा अर्ज पात्रता अंतिम झाल्याशिवाय विद्यापीठाकडे पाठवू नयेत. तसे निदर्शनास आल्यास त्याबाबत गंभीर विचार केला जाईल.

2. अपूर्ण पात्रता अर्ज अथवा शुल्क नसलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत पाठविण्यात येऊ नयेत. जर असे अर्ज या कार्यालयास आले तर त्यावर कार्यवाही न करता दप्तरी दाखल करण्यात येतील आणि त्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
3. शैक्षणिक वर्ष 2016–17 पासून सर्व अभ्यासक्रमांची पात्रता अर्ज **online.shivajiuniversity.in या** पोर्टलमधूनच करावयाची आहे. online प्रिंट फॉर्म विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहेत. तेव्हा सर्व महाविद्यालयांनी याप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे. तसेच येथूनपुढे उपरोक्त अभ्यासक्रमांबाबत जुन्या फॉर्ममधील पात्रता अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. तसेच **On-line** पात्रता अर्ज भरून घेणेबाबतचे प्रशिक्षण आयटी विभागामार्फत देणेत येईल. (यासंदर्भातील प्रशिक्षणाची माहिती आयटी विभागाकडून स्वतंत्रपणे कळविणेत येईल.)
4. पात्रता अर्ज विहित मुदतीत पाठविण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहिल. विहित मुदतीत पात्रता अर्ज विद्यापीठाकडे न पाठविणा–या महाविद्यालयांना दंड आकारण्याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने निर्णय घेतला आहे. तेव्हा पात्रता विभागाचे परिपत्रक क्र. 23 दि.09/05/2012 नुसार विहित मुदतीत पात्रता अर्ज सादर न करणा–या महाविद्यालयांना पहिल्या 15 दिवसांपर्यंत रू. 500/– व 15 दिवसांपेक्षा अधिक काळासाठी रू. 1000/– दंड आकारण्यात येईल.
5. महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देत असताना विद्यापीठ नियमानुसार पात्रता पडताळणी करूनच प्रवेश देण्यात यावेत. सदरचे प्रवेश देत असताना विद्यापीठामार्फत अंतिम पात्रता मंजूर होईपर्यंत संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश प्रोव्हिजनल स्वरूपाचा राहिल. विद्यापीठ नियमानूसार प्रवेशपात्रता मंजूर न झालेस प्रवेश रदद् करणेत येईल. याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना देणेत यावी. व अशा प्रवेशपात्रतेबाबत महाविद्यायाने तातडीने पात्रता विभागाशी संपर्क साधून माहिती व मार्गदर्शन घ्यावे. असे पात्रता अर्ज विद्यापीठाकडे स्वतंत्रपणे पाठवून पत्राद्वारे विद्यापीठाकडून त्वरीत अभिप्राय घ्यावेत. सदर सूचना दरवर्षी परिपत्रकाद्वारे देण्यात येऊनही अशा विद्यार्थ्यांबाबत एकाच गठ्ठयातून अर्ज पाठविल्याने विद्यापीठास अशा विद्यार्थ्यांच्या पात्रतेबाबत त्वरित महाविद्यालयास कळविणे शक्य होत नाही. त्यामुळे महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर अनेक कायदेशीर अडचणी उद्भवण्याची शक्यता विचारात घेऊन या परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. अन्यथा यामुळे उद्भवणा–या कायदेशीर बाबींची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहिल.
6. अन्य विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांबाबत (महाराष्ट्रातील, भारतातील) किंवा परदेशी विद्यार्थ्यांबाबत पात्रता अर्ज स्वतंत्रपणे कव्हरिंग लेटरसह पाठविण्यात यावेत.
7. संबंधित महाविद्यालयात/अधिविभागात प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश काही कारणास्तव रद्द झाले माहिती प्रथम सत्र संपण्यापूर्वी पात्रता विभागास कळविणेत यावे मात्र प्रवेश रदद् केलेल्या विद्यार्थ्याचे पात्रता अर्ज विद्यापीठाकडे पाठविण्यात येऊ नयेत.

8. नियमित अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमानुसार हजेरीबाबत अट लागू असल्याने पूर्ण वेळ नोकरी करणा–या विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येऊ नयेत. त्याप्रमाणे सदर बाब पडताळणी करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहिल.
9. अन्य विद्यापीठातून थेट द्वितीय किंवा तृतीय वर्षास (अभियांत्रिकी विद्याशाखा व्यतिरिक्त) प्रवेश घेणा–या विद्यार्थ्याचे अर्ज स्वतंत्रपणे पाठविण्यात यावेत. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज एकत्रित गठ्ठयातून पाठविण्यात येवू नयेत. त्यामुळे विद्यापीठास अशा विद्यार्थ्यांची पात्रता वेळेत मंजूर करता येणे शक्य होईल. तेव्हा याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

**(B) <u>यु.जी.सी मान्यताप्राप्त विद्यापीठे व अन्य विद्यापीठातील दूरशिक्षण अंतर्गत अभ्यासक्रम पूर्ण करून प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत विशेष सूचनाः–</u>**

**1.** युजीसी, नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक तत्वानुसार पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता 10+2 किंवा समकक्ष (महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकंडरी ॲण्ड हायर सेकंडरी एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे दोन वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम अथवा त्यांच्याशी समकक्ष 10+2 पॅटर्न प्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी, महाराष्ट्रातील, भारतातील अन्य परदेशी विद्यार्थी) **(परिशिष्ट ब)** अशी प्रवेश पात्रता असून पदव्युत्तर अभ्यासक्रमांना 10+2+3 किंवा समकक्ष याप्रमाणे प्राप्त केलेली मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असण्याबाबत युजीसी यांचे निर्देश **(परिशिष्ट 'क')** येथे जोडण्यात आले आहेत.

2. युजीसी, एआयसीटीई व डीईसी यांच्या दि.17/04/2007 रोजीच्या पब्लिक नोटिसनुसार अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, व्यवस्थापन, फार्मसी, आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट आणि केटरिंग, संगणकविषयक कोर्सेस दूरशिक्षण अंतर्गत सुरू करण्याकरिता युजीसी, एआयसीटीई व डीईसी यांच्या जॉईंट कमिटीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तेव्हा अन्य विद्यापीठातून दूरशिक्षण अंतर्गत उपरोक्त अभ्यासक्रम पूर्ण करून (विशेषतः अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, व्यवस्थापन, फार्मसी, आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट आणि केटरिंग, संगणकविषयक अभ्यासक्रम) प्रवेशाकरिता आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये.

अन्य विद्यापीठातून व्यावसायिक किंवा तत्सम अभ्यासक्रम दूरशिक्षण अंतर्गत पूर्ण करून आलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी प्रवेश दिल्याचे निदर्शनास आले आहे. व नंतर अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाने अपात्र ठरविल्याने कायदेशीर प्रकरणे उद्‌भवली आहेत. या बाबींचा विचार करून विद्यार्थ्यांना प्रवेश देत असताना संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठ नियमानुसार तसेच संबंधित अभ्यासक्रमांसाठी निर्धारित करण्यात आलेल्या प्रवेश पात्रतेनुसार प्रवेश देणेत यावेत. व यासंदर्भात काही कायदेशीर बाबी उद्‌भवलेस यास सबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

**वरीलप्रमाणे प्रत्येक वर्षी पात्रता विभागामार्फत स्पष्ट सूचना देण्यात येऊनही काही महाविद्यालयांनी विद्यापीठाचे तसेच ॲपेक्स बॉडीजचे निर्देश विचारात न घेता विद्यार्थी प्रवेशित केल्याने न्यायालयीन प्रकरणे उदभवली आहेत. तेव्हा याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अभिमत विद्यापीठातून दूरशिक्षणअंतर्गत बी.सी.ए पदवी प्राप्त विद्यार्थांना विद्यापीठातील/संलग्न महाविद्यालयातील अभ्यासकमास प्रवेश दिल्यास प्रति विद्यार्थी शैक्षणिक शुल्काच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून महाविद्यालयांकडून आकारण्यात येईल. तसेच या संदर्भात न्यायप्रविष्ठ बाब झाल्यास न्यायालयीन खर्च संबंधित महाविद्यालयांकडून वसूल करणेत येईल. याबाबत सर्व संलग्न महाविद्यालयांना पात्रता विभागाचे पत्र क. 51 दि. 11/6/12 नुसार कळविण्यात आले आहे.**

**तेंव्हा विद्यार्थी प्रवेश अंतिम करत असताना याबाबत दक्षता घेण्यात यावी .**

3. याचप्रमाणे या परिपत्रकासोबत युजीसी मान्यताप्राप्त केंद्रीय, राज्य, खाजगी, व अभिमत विद्यापीठांची यादी **(परिशिष्ट 'ड')** येथे जोडली आहे. यु.जी.सी.चे यांचे नोटिफिकेशननुसार कोणत्याही विद्यापीठास त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर संलग्न महाविद्यालय किंवा अभ्यासकेंद्र सुरू करता येणार नाही. आतापर्यत यु.जी.सी ने कोणत्याही विद्यापीठास त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर संलग्न महाविद्यालय किंवा अभ्यासकेंद्र सुरू करण्यास परवानगी दिलेली नाही. तेव्हा या सर्व बाबींची माहिती घेऊन विद्यार्थी व पालक यांनी प्रवेश घ्यावयाचा आहे. असे यु.जी.सी ने कळविले आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त यादीमध्ये समावेश नसणा—या विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी अशा विद्यापीठांच्या स्टेटसबाबत यु.जी.सी कडून संबंधित विद्यार्थी व पालक यांनी माहिती घ्यावी असेही सूचित केले आहे.

   तेंव्हा उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन यु.जी.सी मान्यताप्राप्त नसलेल्या विद्यापीठांची किंवा दूरशिक्षण अंतर्गत व्यावसायिक किंवा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेतील पदवी घेऊन प्रवेशासाठी येणा—या विद्यार्थ्यांबाबत सर्व महाविद्यालयांनी अधिक दक्ष राहून अशा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

## (C) <u>व्यावसायिक अभ्यासकम व केंद्रीय प्रवेश पदधती असणा—या अभ्यासकमाबाबत विशेष सूचनाः—</u>

1. व्यावसायिक अभ्यासक्रमांबाबत (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, फार्मसी, आर्किटेक्चर, एम.बी.ए.,एम.सी.ए. ,शिक्षणशास्त्र) विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया डीटीई, मुंबई व प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांचेमार्फत पूर्ण करण्यात येतात. तेव्हा या अभ्यासक्मांना प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे व डीटीई, मुंबई व प्रवेश नियंत्रण समिती मुंबई यांची मान्यता मिळालेल्या पत्राची प्रत व विद्यार्थ्यांची यादी विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे.
2. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे (द्वितीय वर्ष पातळीवर) शाखाबदल संदर्भात दरवर्षी स्वतंत्रपणे परिपत्रक संलग्न महाविद्यालयांना पाठविण्यात येते. तेव्हा अभियांत्रिकी महाविद्यालयांनी त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

## (D) दुहेरी पदवी योजनेअंतर्गत अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याबाबत सूचनाः—

1. नियमित अभ्याक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दंडक 78 मधील तरतूदीनुसार Dual Degree योजनेअंतर्गत एकाच वेळी नियमित अभ्यासक्रमाबरोबर दुरशिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमांस प्रवेश घेऊन एक नियमित व एक दुरशिक्षण अंतर्गत पदवी पूर्ण करता येईल त्यानुसार त्यांना रू. 1000/—फीसह प्राचार्यामार्फत /अधिविभागप्रमुखांमार्फत विहित मुदतीत अर्ज शिवाजी विद्यापीठाच्या पात्रता विभागाकडे पाठविता यावेत. अर्जाचा नमूना विद्यापीठाच्या वेबसाईटवर (www.unishivaji.ac.in.) उपलब्ध करणेत आला आहे. तसेच सर्व महाविद्यालयांना ई—मेलव्दारे पाठविण्यात आला आहे.

## (E) पात्रता अर्ज प्रकियेबाबत व विद्यापीठाकडे अर्ज पाठविण्याबाबत संबंधित महाविद्यालयाच्या कार्यालयाकरिता सूचना :—

1. संबंधित अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने संलग्नता मंजूर केलेल्या पत्राची प्रत जोडावी.
2. नवीन विषय, नवीन तुकडी, नवीन विद्याशाखा, वाढीव विद्यार्थी संख्या याबाबत विद्यापीठाने मंजूर केलेली पत्राची प्रत जोडावी.
3. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक 1898 (197/98) द्वमाशि — 1 दि. 24 जून 1999 च्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्याकडून प्रथम गुणपत्रिका, प्रमाणपत्रे यांच्या छायाप्रती स्विकाराव्यात व प्रत्यक्ष प्रवेश देताना मुळ गुणपत्रिका व प्रमाणपत्रे यांच्या सत्यतेबाबत पडताळणी करून यावर प्राचार्यांनी/विभागप्रमुखांनी सही करावी. मूळ गुणपत्रिका, प्रमाणपत्रे इत्यादी विद्यार्थ्यास लगेच परत करावीत. याबाबतही अनेक महाविद्यालये/पदव्युत्तर अधिविभाग विद्यार्थ्याचे मूळ गुणपत्रिका व प्रमाणपत्रे कार्यालयाकडे ठेऊन घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. तेव्हा शासन परिपत्रकानुसार (दि. 12/12/2006 ) कार्यवाही करणे आवश्यक आहे.
4. शंकास्पद परिस्थितीत मूळ गुणपत्रिका, प्रमाणपत्रे रोखण्यात येऊन त्याच्या सत्यतेबाबत महाविद्यालयाने पडताळणी करावी.
5. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका दाखल्याच्या मूळ प्रती विद्यापीठाकडे पाठवू नयेत.
6. सर्व वर्गाच्या आवश्यकतेप्रमाणे साक्षांकित स्वयंस्पष्ट गुणपत्रिकेच्या प्रती जात पडताळणीच्या आवश्यकतेप्रमाणे दाखल्याची साक्षांकित प्रत पात्रता अर्जासोबत जोडावी तसेच आडनावाच्या अद्याक्षराप्रमाणे अर्ज लावावेत.
7. अपूर्ण पात्रता अर्जाची पूर्तता विद्यापीठाने कळविले पासून 15 दिवसाच्या आत करण्यात यावी.
8. पदव्युत्तर परीक्षेबाबत पात्रता अर्जात पदवीच्या विषयाचा अथवा स्पेशलायझेशनचा उल्लेख करणे आवश्यक आहे.
9. पात्रता अर्ज बॉक्स फाईल अथवा लेस फाईल मध्ये योग्य रितीने बंद करून द्यावेत.

10. पात्रता अर्जात ज्या ठिकाणी टक्केवारीची अट आहे. अशावेळी जातीचा अथवा जात पडताळणीचा दाखला जोडलेला असणे आवश्यक आहे.
11. इतर विद्यापीठातून प्रवेश घेणा–या विद्यार्थ्याचे मूळ मायग्रेशन व टी.सी.अभावी विद्यार्थ्याचे पात्रता अर्ज महाविद्यालयात न ठेवता ते विद्यापीठाकडे विद्यार्थ्याचे अंडरटेकिंग घेऊन विहित मुदतीत स्वतंत्रपणे पाठवावे व महाविद्यालयाने मूळ मायग्रेशन व टी.सी.बाबत पाठपुरावा करावा. मूळ मायग्रेशन प्राप्त झाल्याशिवाय त्याची पात्रता अंतिम केली जाणार नाही.
12. प्राचार्य आणि संचालक यांचे दंडक क्र. 22 कडे लक्ष वेधण्यात येते. या दंडकानुसार ज्या विद्यार्थ्यांनी पहिले सत्र समाप्ती पूर्वी आपले पात्रता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही त्यांची सत्रे मान्य करण्यात येणार नाहीत तसेच ज्या विद्यार्थ्यांनी प्रचलित नियमानूसार महाविद्यालयात प्रवेश घेवूनही प्रथम सत्र समाप्ती पूर्वी पात्रता केलेली नाही अशा विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करावेत त्यांना पूढील सत्रात प्रवेश देवू नयेत
13. विद्यार्थ्याच्या वर्गवारीनुसार व विद्यार्थ्याच्या संख्येनूसार पात्रता शुल्क भरल्याची खात्री करावी. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्याकडून जमा झालेली पात्रता प्रमाणपत्राच्या शुल्काची रक्कम प्राचार्य अथवा संचालक यांना आपणाकडे ठेवता येणार नाही याची नोंद घ्यावी. या कार्यालयास विहीत तारखेपूर्वी पाठविण्यात यावेत.
14. एखाद्या विद्यार्थ्याचा शाखा बदल (अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त) करण्यात आला असल्यास प्रथम सत्रातच विद्यापीठास कळवावा.
15. पात्रता अर्ज विद्यापीठात सादर करताना शक्यतो माहिती असणा–या कर्मचा–यासोबतच पाठवून द्यावेत.
16. यादीतील अनुक्रमांक व अर्जक्रमांक सारखेच असावेत व त्याप्रमाणे अर्ज जोडलेले असावेत.

तसेच मॅन्युअल प्रवेश पात्रता अर्जाची विद्यार्थ्याच्या नावाची यादी तीन प्रतीमध्ये पाठवावी.

विद्यार्थांच्या प्रवेशपात्रतेबाबत काही शंका असल्यास 0231–2609137 / 2609138 या फोनवर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

## (F) <u>परदेशी विद्यार्थ्याबाबत प्रवेश व पात्रता अर्ज प्रकियेबाबत संबंधित महाविद्यालयाच्या / अधिविभागांच्या कार्यालयाकरिता सूचना :–</u>

संलग्न महाविद्यालयांमध्ये / विद्यापीठ अधिविभागामध्ये प्रवेश घेवू इच्छिणा–या परदेशी विद्यार्थ्याबाबत सर्व संबंधित महाविद्यालयांनी / विद्यापीठ अधिविभागांनी खालील कागदपत्रे विद्यापीठास (पात्रता विभागास) पाठविणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रांची पूर्तता व नियमानुसार फी जमा केल्याशिवाय अशा विद्यार्थ्यांची पात्रता पूर्ण केली जाणार नाही. तेव्हा याबाबत परेदशी विद्यार्थ्यांना स्पष्ट कल्पना देण्यात यावी. त्याचप्रमाणे अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश, पात्रता मंजूरी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रोव्हिजनल स्वरूपाचे राहतील. कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळल्यास किंवा कागदपत्रांची पूर्तता पूर्ण न झाल्यास या विद्यार्थ्यांची प्रवेश पात्रता मंजूर केली जाणार नाही. अशा विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. याबाबतही संबंधित विद्यार्थ्यांना स्पष्टपणे

कळविण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची/अधिविभागाची राहिल. याकरिता आवश्यक असणा–या कागदपत्रांची यादी खालीलप्रमाणे आहे. त्याचप्रमाणे दंडक 18 **[A]** मधील तरतुदी माहितीसाठी खाली नमुद करण्यात आल्या आहेत.

**Documents Required in respect of Foreign Students:**

- ❖ Marklist (Original & Attested)

Student Visa

- ❖ Passport
- ❖ Police Record (A Letter from Home D.S.P)

*Note: Entrance Examiantion Must Be Passed.*

**O.18 [A]** No foreign student shall be admitted to any Institution/College affiliated to the University or in the University Department except on production of provisional Eligibility Certificate from the University. For obtaining provisional Eligibility Certificate the candidate must apply along with necessary certificates to the University, in the form prescribed by the University and pay fee of Rs. 500/- for provisional Eligibility Certificate.

However, every foreign student except those students except nominated by the Central Government for Medical Course shall have to appear and pass the Entrance Examination to be conducated by the University. The fee for this examination is 100 dollars and for Re-Examination 50 dollars.

After passing the Entrance Examination the candidate shall take admission to concerned class in an affilliated college or recognised Instiution as the case may be, and shall send his application for final Eligibility Certificate duly completed alongwith a fee of Rs.500- to the University, through the Principal of the College/Recognised Institution

यासंदर्भातील सर्व माहिती **www.unishivaji.ac.in** या शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटवर ही (संकेतस्थळावर) उपलब्ध आहे.

आपला विश्वासू,

सही
प्र. कुलसचिव

सोबतः–वरीलप्रमाणे